


दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०१ ● अंक : २४३ ● मंगळवार, दि. १८ जून २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये
● Volum : 1 ● Issue : 243 ● Tuesday, 18 June 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-



नवले ब्रिजवरील कोंडीमुळे चाकरमान्यांना फटका 3



वारजे ते कोंढवे-कोपरे रस्त्यावर ठिकठिकाणी साचते पाणी 4

# नऱ्हेकरांचा संघर्ष सुरूच

## नागरी सुविधांसाठी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे आक्रमक | व्यापक आंदोलनाचा मोरे यांचा इशारा | महानगरपालिका नको गड्या, आपली ग्रामपंचायतच बरी..!



सध्याच्या घडीला नगरसेवक किंवा शासकीय समिती देखील उपलब्ध नाही. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या समस्यांना प्रशासन जुमानत नाही. दिवसेंदिवस या समस्या अजून गुंतागुंतीच्या होत जाणार आहेत. झोपलेल्या प्रशासनाला खडबडून जागे करण्यासाठीच आम्ही आगामी काळात तीव्र व व्यापक स्वरूपाचे आंदोलन करणार असल्याचा इशारा भूपेंद्र मोरे यांनी दिला.



**पुणे (लक्ष्मण साबळे) (दै. आरंभ पर्व)**

शहराच्या लगतचा आणि झपाट्याने विकसित होणारा नऱ्हे हा भाग साधारण अडीच वर्षांपूर्वी महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाला. त्यानंतर महानगरपालिकेने तातडीने नागरी सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना मात्र, तीनपट कर घेवून कोणत्याही मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या नाहीत. यामुळे 'महानगरपालिका नको गड्या, आपली ग्रामपंचायतच बरी' असे म्हणायची वेळ नऱ्हेकरांवर आली आहे.

गेल्या अडीच वर्षात या भागातील सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी सातत्याने या संदर्भात प्रशासनाकडे नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. विभागानुसार आणि कामानुसार देखील त्यांच्यावतीने पत्रव्यवहार करण्यात आला आहे. नऱ्हेकरांना हक्काच्या नागरी सुविधांसाठी उपोषण देखील केले होते. मात्र, प्रशासनाने आश्वासने देताना पुन्हा एकदा नऱ्हेकरांना नागरी सुविधांपासून वंचित ठेवले आहे.

यासाठीच आज 'नऱ्हेकरांच्या समस्यांचे पोस्टमार्टम' या सदराखाली भूपेंद्र मोरे यांच्या वतीने नागरी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी राजाभाऊ जाधव, हरीश वैद्य, आनंद थेऊरकर, संकेत चाचुर्डे, प्रशिक दारुंडे, सुरज दांगडे या मान्यवरांसह नऱ्हे गावातील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाढीव मालमत्ता कर, शास्तीकर, रस्त्यांची दुरवस्था व त्यामुळे होणारे छोटे मोठे अपघात, भर उन्हाळ्यात होणारी पाणीकपात, टँकर माफियांचा सुळसुळाट, ग्रामपंचायत क्षेत्रातील नवीन मालमत्ता नोंदी, नवले पुलावर सातत्याने होणारे अपघात अशा अनेक मुद्द्यांवर नऱ्हेगावातील नागरिकांनी समस्यांचा पाढा वाचला.

याविषयी बोलताना सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे म्हणाले, गेल्या अडीच वर्षांपासून या भागात नागरी सुविधांचा विकास व्हावा, या उद्देश्याने प्रशासनाशी आम्ही भांडत आहोत.

यासाठी उपोषण देखील केले. मात्र, केवळ 8 महिन्यात आम्ही समस्या सोडवितो, असे सांगून प्रशासनाने पुन्हा एकदा आमचा विश्वासघात केला आहे.

## इशाऱ्यानंतर पालिकेच्या कर्मचाऱ्याची पळापळ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाढीव मालमत्ता कर, शास्तीकर, रस्त्यांची दुरवस्था व त्यामुळे होणारे छोटे मोठे अपघात, भर उन्हाळ्यात होणारी पाणीकपात, टँकर माफियांचा सुळसुळाट, ग्रामपंचायत क्षेत्रातील नवीन मालमत्ता नोंदी, नवलेपुलावर सातत्याने होणारे अपघात अशा अनेक मुद्द्यांवर नऱ्हेकरांनी काल सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली बैठक घेतली होती. त्यामुळे मरगळलेल्या प्रशासन आज सुट्टीच्या दिवशी देखील खडबडून जागे झाले आणि किमान रस्त्यांच्या कामांना सुरुवात केली.

शहराच्या लगतचा आणि झपाट्याने विकसित होणारा नऱ्हे हा भाग साधारण अडीच वर्षांपूर्वी महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाला. त्यानंतर महानगरपालिकेने तातडीने नागरी सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना मात्र, तीनपट कर घेवून कोणत्याही मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या नाहीत. त्यामुळे नऱ्हे येथील नागरीक हैराण झाले होते.

काल (रविवारी) सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या 'नऱ्हेकरांच्या समस्यांचे पोस्टमार्टम' या सदराखाली बैठकीचे नियोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहताना आपल्या समस्या मांडल्या. या समस्यांच्या निराकरणासाठी भूपेंद्र मोरे सातत्याने प्रशासनाकडे गेल्या अडीच वर्षांपासून पाठपुरावा करत आहेत.



● रस्ते आणि बांधकाम विभागाकडून कामाला सुरुवात

कालच्या बैठकीनंतर रस्ते व बांधकाम विभागाच्या वतीने कामांना सुरुवात करण्यात आली आहे. आज बकरी ईदची सुट्टी असून देखील महानगरपालिकेच्या अधिकारी, ठेकेदार यांनी जेसीबीच्या सहाय्याने रस्त्याच्या कामे सुरु ठेवली. त्यामुळे किमान रस्त्यावरून चालताना सांडपाण्यात चालावे लागणार नाही, असा विश्वास नऱ्हे येथील ग्रामस्थांनी व्यक्त केला.



'नऱ्हेकरांच्या समस्यांचे पोस्टमार्टम' या उपक्रमामुळे गावात असणाऱ्या समस्यांवर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेवून तातडीने कामाला सुरुवात केली. प्रशासनाने उचललेले हे पाउल निश्चित प्रशंसनीय आहे. त्यामुळे आगामी काळात देखील अशाच प्रकारे प्रत्येक समस्येचे 'पोस्टमार्टम' करून नऱ्हेवासीयांच्या समस्या तातडीने कशा सुटतील यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

\- भूपेंद्र मुरलीधर मोरे, सामाजिक कार्यकर्ते

# केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्थेतर्फे गुणवंताचा सत्कार

## दिमाखदार सोहळ्यात समारंभ संपन्न : सायकल कॅरमबोर्ड क्रीडा साहित्य अशा असंख्य बक्षिसांची लयलूट

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड वडगाव बुद्रुक येथील केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्था , श्रीसाई सेवा मंदिर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता 10 वी आणि 12 वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन मा.नगरसेवक आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिदास चरवड यांनी केले होते.

धायरी फाटा सुवासिनी मंगल कार्यालय येथे संपन्न झालेलेल्या या सोहळ्याचे 24 वे वर्ष होते. दिपप्रज्वलन, सरस्वतीपूजन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. खडकवासला विधासभा मतदार संघातील तसेच पुणे शहरातील तब्बल 120 शाळामधील इयत्ता 10 वी आणि 12 वी च्या 75 टक्के पेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले.



तसेच खडकवासला मतदार संघाचे शहर विभाग , धनकवडी , आंबेगाव बु, विभाग , वारजे- शिवणे, उत्तमनगर विभाग , खडकवासला ग्रामीण - किरकटवाडी ते मालखेड विभाग , खडकवासला ग्रामीण- खेडशिवापूर परिसर विभाग, खडकवासला वडगाव बुद्रुक नागरिक - पुणे शहर शाळा विभाग अशा सहा विभाग निहाय 10 वी आणि 12 वी च्या प्रथम तीन विद्यार्थ्यांना सायकल, कॅरम बोर्ड, बॅग व इतर क्रीडा साहित्य देऊन गौरवण्यात आले. तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या आणि कला व क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल खनापूर येथील महात्मा गांधी विद्यालय आणि कनिष्ट महाविद्यालयास सन 2024 चा आदर्श विद्यालय सिंहगड करंडक 2024 पुरस्कार देण्यात आले..

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार भीमराव अण्णा तापकीर याच्या हस्ते संपन्न झाले, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार सुनिलभाऊ कांबळे उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदशन करण्यासाठी अखिल भारतीय प्राचार्य फेडरेशनचे अध्यक्ष प्रा.डॉ.सुधाकरराव जाधवर सर , प्रेममूर्ती ह.भ.प. नवनाथ महाराज लिमन उपस्थित होते. संस्थेच्या सचिव पूनमताई चरवड, महात्मा गांधी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक शशिकांत जाधव, भीमराव आदलिंग, विजय कोळी, रमेश कोळी, सामजिक कार्यकर्ते बाजीराव पारगे, हरिदास लगड, अनिल चरवड, किशोर पोकळे, सारंग नवले, सागर भूमकर, दत्तात्रय देशपांडे, डॉ.विवेक काळे, प्रकाश गराडे, प्रकाश लिम्हण, चंद्रकांत पवळे, केदार जाधव, वनिताताई वाबळे, गौरीताई पवळे, जानवीताई जाधव, शितलताई चरवड, छायाताई चरवड, वैशालीताई पाटील आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.





# एकटेपणाशी करा मैत्री!

जनसंपर्क मोठ्या प्रमाणात असेल, तर तुमच्या बहुतेक गरजा पूर्ण होऊ शकतात आणि त्याहीपेक्षा दुसरा सुंदर मार्ग म्हणजे तुम्ही स्वतःवर प्रेम करायला शिका, जे तुम्हाला इतरांकडून हवं आहे. तुम्ही स्वतःची सगळी काळजी घ्यायला शिका, जी तुम्हाला दुसऱ्यांकडून घेतली जाणं अपेक्षित आहे. आजूबाजूला नीट पाहिलं की लक्षात येणारी एक महत्त्वाची बाब अशी की, मी जे अनुभवतोय ती खूप सामान्य गोष्ट आहे, मी एकटाच नाही. माझ्यासारखे अनेकजण आहेत. ही भावना तुम्हाला तुमच्या आजूबाजूच्या लोकांशी मनापासून जोडून ठेवते. फक्त रक्ताच्या आणि जवळच्या आपल्या लोकांशी नाही तर सर्वांशीच. एकटेपणा अनुभवताना शिक्षा म्हणून पाहू नका, तर त्याच्याशी मैत्री करा आणि जगणं सोपं करा.

आजकाल आपल्या आजूबाजूला अशी अनेक माणसं दिसतात, जी अगदी एकटी आहेत. कालमान आणि परिस्थितीमुळे काही जणांनी स्वतः हा एकटेपणा स्वीकारला आहे, तर काही जणांच्या नशिबी तो दुर्दैवाने आला आहे आणि वयोमानाप्रमाणे एक वेळ अशी येते की जोडीदार पुढे निघून जातो आणि दुसरा एकटेपण जगत राहतो. कारणं काहीही असली तरी अखेर परिणाम एकच... कंटाळवाणा एकटेपणा. या समस्येवर मात करायची तर?

अरुंधती वय वर्षं 55, सॉफ्टवेअर इंजिनीअर. अपेक्षेप्रमाणे मुलगा मिळाला नाही, म्हणून थांबली. मग लग्न ठरलंच नाही. आई-वडील गेले. भाऊ नोकरीनिमित्ताने दुसऱ्या शहरात राहतो. आता चार रूमच्या फ्लॅटमध्ये एकटीच राहाते. अजित वय 68 वर्षं. दोन्ही मुलं परदेशात. मागच्या वर्षी बायको गेली. आता एकटाच आहे. नातेवाईक किती पुरे पडणार? नयना वयाच्या साठीनंतर नवऱ्यापासून वेगळी झाली. नवऱ्याचा हट्टी स्वभाव 40 वर्षं सहन केला. मुलांची लग्नं झाली. सासू-सासऱ्यांची जबाबदारी संपली. आता कटकटी नको वाटतात म्हणून स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. जगन्नाथचा प्रश्न वेगळाच आहे. लग्न झालं आणि सहा महिन्यांत बायको माहेरी गेली, ती परत आलीच नाही. घटस्फोट झाला. त्याचा लग्न या विषयातला रसच संपला. आता एकटाच असतो. अपर्णाला लग्न करायचंच नव्हतं. तिला स्वातंत्र्य प्रिय होतं. नोकरी, करिअर आणि मित्रमंडळी हेच खरं आयुष्य आहे, असं तिला वाटत होतं. आता आयुष्याची संध्याकाळ जवळ येतेय तशी त्याच स्वातंत्र्याबरोबर स्वेच्छेने स्वीकारलेल्या एकटेपणाची तिला भीती वाटू लागलीय. आजकाल आपल्या आजूबाजूला अशी किती तरी माणसं दिसतात जी अगदी एकटी आहेत. कालमान आणि परिस्थितीमुळे त्यांना हा एकटेपणा आला आहे. काहीजणांनी तो स्वतः स्वीकारला आहे, तर कधी तो दुर्दैवाने त्यांच्या नशिबी आला आहे आणि वयोमानाप्रमाणे एक वेळ अशी येतेच की जोडीदार पुढे जातो आणि दुसरा एकटेपण बरोबर घेऊन जगत राहतो. कारणं काहीही असली तरी अखेर परिणाम एकच. कंटाळवाणा एकटेपणा...



खरं तर, आपण आयुष्यात अनेक गोष्टींचं नियोजन करतो. शिक्षण, करिअर, पहिला पगार, लग्न, मुलांचा निर्णय, निवृत्ती असं बरंच काही. अर्थात यामागे अनेकदा आर्थिक नियोजनाला प्राधान्य असतं. मात्र, निवृत्तीनंतर आर्थिक नियोजनासोबतच या कालावधीत मिळालेल्या अमाप मोकळ्या वेळेचा सदुपयोग कसा करायचा, मुलं सोबत राहणार नसतील तर आपली 'सपोर्ट सिस्टीम' कशी निर्माण करायची, रिकामा वेळ कसा व्यतीत करायचा, आजारपण असेल, तर त्याचं व्यवस्थापन कसं करायचं, अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टींचं नियोजन करायला हवं. पण प्रत्यक्षात त्यावेळी आपण त्याचा विचारही करत नाही. नोकरी-व्यवसायात मन रमलेलं असतं, वेळ जाण्याची असंख्य साधनं आसपास असतात, प्रकृती साथ देत असते, तोवर फारसे प्रश्न येत नाहीत किंवा ते मनातही येत नाहीत. जणू हे सारं असंच कायमस्वरूपी चालत राहणार, असं आपण गृहीत धरतो. असं म्हणतात की, प्रौढावस्थेच्या तीन अवस्था असतात. 'गो गो', 'स्लो गो' आणि 'नो गो'. यातली प्रत्येक अवस्था कुणी सोबत नसेल तर अधिकाधिक अवघड होत जाते आणि त्यातूनच अनेक मानसिक आणि सामाजिक प्रश्न निर्माण होतात आणि होत राहतात. खरं तर हा फार मोठा जागतिक प्रश्न आहे. पण एकत्र कुटुंबव्यवस्थेचं गुणगान गाणाऱ्या भारतीय संस्कृतीतही अलीकडे हे प्रश्न मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहेत. विभक्त कुटुंबव्यवस्था, परदेशी जाऊन सेटल होणारी मुले, घटस्फोटाचे वाढते प्रमाण या सर्वांमुळे या प्रश्नांची तीव्रता अधिक वाढताना दिसत आहे.

तसं पाहिलं तर कोणत्याही वयात एकटेपणा नकोसाचं असतो. उतारवयात तर या एकटेपणामुळे अनेक भावनिक-मानसिक समस्या निर्माण होतात. जबरदस्त नैराश्य येणं किंवा कधी कधी आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेणं अशा घटनाही घडतात. त्यामुळे एकटेपणाचा बाऊ करून नको ते प्रश्न निर्माण करण्यापेक्षा त्याच्याशी मैत्री करून उपाय शोधणं आवश्यक आहे. या काळात सकारात्मक राहणं गरजेचं आहे. शिवाय आयुष्यातील सगळ्या बऱ्या-वाईट गोष्टींचा स्वीकार करायला शिकणं अत्यंत महत्त्वाचं आहे. माझी मुलं परदेशात गेली तर, मुलं वेगळी राहिली तर, मुलांनी जवळ राहून माझ्याशी संवाद ठेवला नाही तर, संपूर्ण दिवस कसा व्यतीत करायचा, भिशी-हास्य क्लब-भटकंती याबरोबरच इतर उपाय काय असतील, या सर्वांचा विचार करून आपण पुढील आयुष्याचं नियोजन केलं पाहिजे.

एकटेपणाची भावना दूर करण्यासाठी स्वतःला व्यस्त ठेवण्यासारखा दुसरा उत्तम उपाय नाही. घरातून बाहेर पडावं. उद्यान, सामाजिक कार्यक्रम यांसारख्या ठिकाणी वेळ घालवावा. जास्तीत जास्त लोकांमध्ये मिसळण्याचा प्रयत्न करावा. तुम्ही बाहेर वेळ घालवता तेव्हा आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे लक्ष जातं आणि मनातील एकटेपणाची भावना दूर होण्यास मदत होते. तुम्ही जिममध्ये किंवा लायब्ररीमध्ये जाऊ शकता. एके काळी पुरे करायचे राहिलेले छंद सुद्धा जोपासू शकता. गाणं शिकणं, वाद्य वाजवणं, वाचन करणं यामुळे मन रमतं. ऑनलाईन जग हा आजच्या काळात इतरांशी कनेक्ट होण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. याचा योग्य वापर केल्यास तुम्ही एकटेपणातून बाहेर येऊ शकता. मात्र, ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा चुकीचा वापर केल्यास तुमची एकटेपणाची भावना आणखी वाढू शकते. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर काळजीपूर्वक करायला हवा. विचार बदलले तर जग बदलतं. त्यामुळे एकटेपणा दूर करण्यासाठी विचार बदलणं गरजेचं आहे.

मुलं स्वतंत्र झाली तशी सुरेशराव आणि प्रभाताईंनी शहरातील सर्व सोयींनी युक्त अशा वृद्धाश्रमात आपलं नाव नोंदवलं आणि चार समवयस्क लोकांसह जगण्याची सवय करून घेतली. व्यायाम, गप्पा, वाचन, सिनेमा-नाटकाला जाणं असा भरगच्च दिनक्रम या दोघांनी स्वीकारला. उद्या काही घडलं आणि दोघांपैकी एकजण मागे राहिलं तर एकटं वाटायला नको, असा साधा सरळ विचार त्यांनी केला तर गौरीताईंनी उतारवयातले संभाव्य धोके पाहिले आणि त्या मुलाकडे परदेशात राहायला गेल्या. उद्या आजारी पडलं, अंथरूणावर पडून राहिलं तर आपलं कोण करणार? मुलांसह राहिलं तर निदान माझं सगळं ते करू शकतील आणि त्यांनाही त्याचं समाधान मिळेल, असा विचार त्यांनी केला. गौरीताईंनी मुलांच्या निर्णयाचा स्वीकार केला आणि गावातील सर्व मालमत्ता विकून त्या मुलाकडे स्थायिक झाल्या. मला तिकडे करमणार नाही, माझं सगळं काही इथेच आहे. ते सोडून मी बाहेर कशी जाऊ, अशा प्रश्नांना त्यांनी चटकन उत्तरं शोधली आणि निर्णय घेतला.

एकटेपणावर मात करण्यासाठी आयुष्यात पुन्हा एकदा जोडीदार निवडण्यालाही आता समाजमान्यता मिळू लागली आहे. आज अनेक ज्येष्ठ नागरिक आयुष्याच्या 'सेकंड इनग'मध्ये सोबतीची गरज म्हणून लग्न अथवा 'लिव्ह इन'मध्ये राहतात. उतारवयातील एकटेपणावर मात करत अधिक चांगल्या पद्धतीने जगतात. बदलत्या काळाप्रमाणे प्रश्नही बदलतात आणि त्याबद्दल त्या प्रश्नांना उत्तरही मिळत जातात. 'अथश्री'सारखे वृद्धाश्रम (संपूर्णपणे वृद्धांचे असलेले पुण्यातील सर्व सोयींनी सुसज्ज असे वृद्धाश्रम) हे समवयस्क लोकांच्या मैत्रीसाठी मिळालेले आणखी एक उत्तर आहे असे म्हणता येईल. विविध प्रकारचे 'मैत्री ग्रुप'देखील आहेत. जे एकमेकांना ज्येष्ठ नागरिकांना सोबत करणं, गरजेप्रमाणे दुखण्यात किंवा हॉस्पिटलमध्ये मदत करणं यासारखे उपक्रम राबवतात. यात प्रौढांपासून विविध वयोगटातील तरुणही आहेत, हे विशेष. इतकंच नव्हे तर, अंथरुणाला खिळून असलेल्या अतिवृद्ध रुग्णांसाठी विविध प्रकारची 'डे केअर सेंटर्स' आणि 'असिस्टेड हेल्प सेंटर्स'ही आहेत. एकटेपणा संपत नसतो. पण हे नक्की, की तो आयुष्यातला एक अटळ टप्पा असतो. अशा वेळेस प्रत्येक माणसाकडे दोन पर्याय असतात. एक तर प्रवासाचा मार्ग बदलायचा किंवा जिथे पोहोचायचे ती जागा बदलायची.

## पुणे जिल्हा परिषद समोर तळं साचले...



गेल्या चार पाच दिवसांपासून पुणे जिल्हा परिषद गेट जवळ चेंबर जाम झाले आहे. संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन चेंबर दुरुस्ती करावे अशी नागरिकांनी मागणी केली आहे. (फोटो: धोंडपा नंदे)

## 'बाई गं' चित्रपटाचं नवीन गाणं 'चांद थांबला'

**पुणे (दै. आरंभ पर्व)** रिमझिमत्या प्रेमाने, दुनियेला मोहिनी घालणारं 'बाई गं' चित्रपटाचं नवीन गाणं 'चांद थांबला' रिलीझ झालय. मराठी मनोरंजन विश्वातील एक रोमँटिक हिरो अशी ओळख असलेला अभिनेता स्वप्नील जोशी या गाण्यात आपल्या जुन्या ऑनस्क्रीन जोडीदारासोबत म्हणजेच प्रार्थना बेहेरे सोबत रोमान्स करताना दिसतोय. साल 2015 मध्ये आलेला चित्रपट मितवा नंतर आता हि जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर कमाल करायला तयार आहे .एका मोठ्या गॅप नंतर स्वप्नील आणि प्रार्थना एकत्र काम करतायत त्यामुळे आपल्या आवडत्या जोडी ला बघण्यासाठी प्रेक्षक उत्सुक




आहेत. मागील काही दिवसात प्रार्थना ने आपल्या सोशल मीडियावर ह्या गाण्याची एक झलक फॅन्स ला दाखवली होती. या गाण्यात अभिनेता स्वप्नील जोशी प्रार्थना सोबत थिरकताना दिसत आहे. कलाकार आणि संगीत सोबतच या गाण्याचं चित्रीकरण सुद्धा तितकच सुंदर आहे. नितीन वैद्य प्रोडक्शन, ए बी सी क्रिएशन आणि इंद्रधनुष्य मोशन पिक्चर्स प्रस्तुत 'बाई गं' चित्रपटाचा हे दुसरं गाणं आहे. या चित्रपटात स्वप्नील जोशी आणि प्रार्थना बेहेरे सह सुकन्या मोने, अदिती सारंगधर, दीप्ती देवी, नम्रता गायकवाड, नेहा खान सुद्धा आहे. अभय जोधपूरकर आणि आनंदी जोशी ह्यांनी "चांद थांबला" ह्या गाण्याला आपला आवाज दिला आहे. तर वरुन लिखते ह्यांचं संगीत आहे. गाण्याचे बोल समीर सामंत ह्यांनी लिहिले आहेत. "चांद थांबला" हे गाणं आपल्याला एवरेस्ट मराठी वर पहायला मिळेल. या चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद पांडुरंग कृष्णा जाधव आणि विपुल देशमुख यांचे आहेत.

## यूएसएच्या लीहाय विद्यापीठाने भारताशी असलेल्या द्विपक्षीय संबंधांना दिले अधिक बळ



**पुणे (दै. आरंभ पर्व)** भारताशी आपले शैक्षणिक नाते अधिक प्रबळ करत यूएसएमधील काही सर्वात प्रतिष्ठित खासगी विद्यापीठांपैकी एक असलेल्या लीहाय (Lehigh) विद्यापीठाने देशामध्ये बिल्डिंग फ्युचर्स वर्कशॉप नावाचा आपला पहिला उपक्रम आयोजित केला. कल्पक बुद्धिमत्ता, कौशल्य संच आणि सर्जनशील विचारप्रक्रियेची जडणघडण करण्याचा आपला ध्यास अधोरेखित करत बिल्डिंग फ्युचर्स वर्कशॉपमध्ये सहभागी विद्यार्थ्यांसाठी उद्योजकीय उपक्रम आयोजित करण्यात आले. या सत्रांनी विद्यार्थ्यांना वास्तविक जागतिक समस्यांना सर्जनशीलतेने सामोरे जाण्यास आणि समुदायांवर तसेच संस्थांवर प्रभाव टाकतील अशा नव्या धाडसी कल्पना निर्माण करण्यास मदत केली. ही कार्यशाळा म्हणजे विद्यार्थ्यांसाठीच्या प्रवेश कार्यक्रमांना चालना देण्याच्या आणि विद्यापीठाशी नवीनतम भागीदारी साकारण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने भारताप्रती जपलेल्या बांधिलकीच्या दिशेने उचललेले एक पाऊल होते. इतकेच नव्हे, तर या कार्यशाळेने अध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना कॉलेजमधील प्रवेशप्रक्रियेच्या गुंतागुंतींमधून मार्ग काढण्यासाठी व आंतरराष्ट्रीय शिक्षणाच्या गतीशील क्षेत्रामध्ये सामोऱ्या येणाऱ्या असाधारण आव्हानांना हाताळण्यासाठी मदत करून त्यांना सक्षम बनविले. या दोन दिवसांच्या कार्यशाळेमध्ये भारतभरातील निवडक समुपदेशक आणि विद्यार्थी सहभागी झाले व यामध्ये लीहाय विद्यापीठाच्या वरीष्ठ पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सर्वसमावेशक सत्रे घेण्यात आली. कार्यशाळेतील विषयांमध्ये प्रभावी शिफारसपत्रे लिहिण्यापासून ते मार्ग शोधण्यापर्यंत, शैक्षणिक वातावरणामध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याला आधार देण्यापासून ते उद्योजकीय उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये परिणामवादी दृष्टी विकसित करण्यापर्यंतच्या विविध विषयांचा समावेश होता.

## क्राईस्ट युनिव्हर्सिटी लवासाचा नववा वार्षिक दीक्षांत समारंभ

- भारतामध्ये जागतिक शैक्षणिक केंद्र बनण्याचे सामर्थ्य - ज्ञानेश्वर मुळे

**पुणे (दै. आरंभ पर्व)** भारतातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात विशेषत: यूएस, यूके आणि ऑस्ट्रेलिया जात असतात, परंतु आपली वैविध्यपूर्ण संस्कृती, परंपरा, समृद्ध इतिहास आणि प्राचीन ज्ञानामुळे भारतामध्ये जगाचे शैक्षणिक केंद्र बनण्याची क्षमता आहे असे मत मालदीव मधील भारताचे माजी उच्चायुक्त श्री. ज्ञानेश्वर मुळे यांनी व्यक्त केले.



क्राईस्ट युनिव्हर्सिटी, लवासाचा नववा दीक्षांत समारंभ शनिवारी आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे श्री.ज्ञानेश्वर मुळे,क्राईस्ट युनिव्हर्सिटीचे कुलगुरू फादर डॉ. जोसेफ सीसी, क्राईस्ट युनिव्हर्सिटी लवासाचे संचालक व अधिष्ठाता फादर डॉ.लिजो थॉमस, निबंधक अनिल जोसेफ पिंटो , शैक्षणिक निबंधक डॉ. जॉनी जोसेफ आणि विविध विभाग प्रमुख, विद्यार्थी व पालक उपस्थित होते .

या भव्य समारंभात रँक धारक आणि सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. एमबीए , बीएससी आणि एमएससी (इकॉनॉमिक्स अँड ऍनालीटीक्स ), बीएससी आणि एमएससी (डेटा सायन्स), कायदा आणि वाणिज्य यासह विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांमधील 605 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आल्या. दीक्षांत समारंभात पदवीपूर्व अभ्यासक्रमातील 407 विद्यार्थी, पदव्युत्तर अभ्यासक्रमातील 195 आणि 3 पीएचडी विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आल्या. प्रमुख पाहुणे श्री ज्ञानेश्वर मुळे, यांनी 10 वर्षे पूर्ण केल्याबद्दल क्राइस्ट युनिव्हर्सिटीचे अभिनंदन केले.त्यांनी सांगितले की पदवी म्हणजे नवीन जबाबदारी सुरु होते.विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक वृत्ती असली पाहिजे आणि देशाचा सर्वांगीण विकासमध्ये योगदान दिले पाहिजे. ते पुढे म्हणाले की, सध्याच्या जगात विद्यार्थ्यांना मोठ्या संधी उपलब्ध आहेत.विद्यार्थ्यांनी स्वत:चा विकास करत उद्योग व समाजात मोलाची भर घातली पाहिजे.

क्राईस्ट युनिव्हर्सिटीचे कुलगुरू जोसेफ सीसी म्हणाले की, 1969 मध्ये क्राईस्ट युनिव्हर्सिटीची कॉलेज म्हणून सुरु झाली होती, आता भारतभरात सहा ठिकाणी कॅम्पससह विद्यापीठाचा विस्तार झाला आहे. ते पुढे म्हणाले की, दीक्षांत समारंभ हा कोणत्याही विद्यार्थ्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असतो,कारण केवळ पदवी नाही,तर मिळवलेले ज्ञान, बनलेली मैत्री आणि प्रत्येक विद्यार्थ्याला आकार देणारे अनुभव यांचाही समावेश असतो क्राईस्ट युनिव्हर्सिटी लवासाचे संचालक व अधिष्ठाता डॉ.लिजो थॉमस यांनी सांगितले की, क्राईस्ट युनिव्हर्सिटीचे हे एकमेव निवासी कॅम्पस आहे. आम्ही 2014 मध्ये फक्त 12 विद्यार्थ्यांसह सुरुवात केली होती आणि आज आमच्याकडे 2000 विद्यार्थी आहेत.याचबरोबर आज एलएलबी बॅचचा पहिला दीक्षांत समारंभ आहे.

## थोडक्यात



### शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थींचे ढोल ताशांच्या गजरात स्वागत

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** राजगुरूनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा थिगळस्थळ व जिल्हापरिषद प्राथमिक शाळा पडाळवाडी शाळेत दाखल होणाऱ्या नवोदित विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. दरम्यान शाळेचा पहीला दिवस असल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत होता.तर पालकांमध्ये शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी लगबग चाललेली दिसत होती. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थांना शालेय साहित्य वह्या-पुस्तकांचे वाटप करण्यात आले. दरम्यान, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पडाळवाडी येथे शिक्षण विस्तार अधिकारी जीवन कोकणे व खेड तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व बाळासाहेब सांडभोर, मुख्याध्यापिका ज्योती बच्चे यांच्या हस्ते विद्यार्थांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच जिल्हापरिषद प्राथमिक शाळा थिगळस्थळ येथेही नवोदित विद्यार्थांचे स्वागत ढोल ताश्याच्या वाद्यात जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्रपमुख दत्तात्रय गोसावी, मुख्याध्यापिका विद्या गावडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश थिगळे, देवीदास नेहरे, महादु राळे, वैशाली सातकर, रोहिणी जाधव, दिपाली जुनवणे, सीमा राऊत, सुचिता कराळे, शुभांगी मोरमारे आदी शिक्षक पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पेरणीपूर्व कामांना वेग; खते, बियाण्यांच्या खरेदीसाठी लगबग



**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** खेड तालुक्यात खरिपाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु झाली आहे. शेतात पेरणीपूर्व मशागतीची कामे केली जात असतानाच शेतकरी बी-बियाणे, खतांची जुळवाजुळव करीत असल्याचे दिसून येत आहे. राजगुरूनगर शहरासह तालुक्यातील खते, बी-बियाणे विक्रेत्यांकडे तसेच आठवडी बाजारातही गर्दी वाढली आहे. राजगुरूनगर शहर व परिसरात गेल्या आठवड्यापासून चार ते पाच वेळा मोठा दमदार पाऊस पडला. शिवारात सखल भागात तसेच नांगरणी करून ठेवलेल्या जमिनीत पाणी साठले, ते खोलवर मुरले. गरजेइतकी ओल झाल्यानंतर शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीच्या बैल आणि औतांच्या साहाय्याने तर अनेकांनी ट्रॅक्टरने मशागत केली. अनेक भागातील शेतजमीनी पेरणीसाठी तयार झाल्या आहेत. पाऊस काहीसा थांबला आहे. त्यामुळे शेतकरी खरीप हंगामात पेरणीसाठी लागणारे दर्जेदार बी-बियाणे आणि खतांची खरेदी करून हे साहित्य घरी आणून ठेवण्याची लगबग करत आहे. खते, बियाणे विक्रीच्या दुकानात शेतकऱ्यांनी गर्दी केल्याचे पाहायला मिळत आहे. युरिया व काही खतांची वानवा असल्यामुळे शेतकरी पर्यायी खतांची खरेदी करताना दिसत आहेत. काही भागातील शेतकरी पारंपरिक पद्धतीने घरी तयार करण्यात आलेल्या बियाण्यांची निवड करताना दिसत आहेत. तालुक्याच्या पश्चिम भागात भाताचे मोठे क्षेत्र आहे, तर पूर्व भागात पठारावरील शेतात बटाटा पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते.

## थोडक्यात



## डॉ. दुधभाते नेत्रालयाच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण

**पुणे (आरंभ पर्व) :** गेल्या तेरा वर्षांपासून रुग्णसेवां करीत असलेल्या डॉ. दुधभाते नेत्रालय आणि रेटिना सेंटरच्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक उपक्रमांतर्गत वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. रुग्णालयाचा वर्धापनदिन हा जुलै महिन्यात असल्याने सामाजिक बांधिलकी जपत पुढील तीन महिने विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नुकतेच खानापूर येथील महात्मा गांधी विद्यालय परिसरात 100 देशी वृक्षांचे रोपण करून तब्बल एक लाख वृक्षारोपण करून "सुजलाम सुफलाम" भारतभूमी निर्मितीसाठीचा संकल्प यानिमित्ताने केला गेला. यावेळी डॉ दुधभाते नेत्रालयाचे सर्वेसर्वा डॉ. अनिल दुधभाते, डॉ. डिम्पल दुधभाते, प्रियंका एडके, गणेश मोटे, शीतल हिराळकर, डॉ. स्नेहल मानपुत्र, महात्मा गांधी विद्यालय खानापूरचे माजी प्रभारी मुख्याध्यापक शशिकांत जाधव, जेष्ठ शिक्षक भीमराव आदलिंग, इंग्लिश मिडीयम प्री-प्रायमरी स्कूल व ग्रामपंचायत सदस्य अंजना जावळकर, प्रियंका जावळकर, अपेक्षा मोरे उपस्थित होत्या. नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते म्हणाले की, 13 वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या डॉ दुधभाते नेत्रालय आणि रेटिना सेंटर मध्ये नेहमीच आरोग्यविषयक आणि सामाजिक उपक्रम करण्यात एक पाऊल पुढे असते. रुग्णालयाचे सर्व 50 हुन अधिक कर्मचारी रुग्णसेवा व समाजसेवेसाठी नेहमी कार्यरत असतात. त्यामुळेच रुग्णालयाची घोडदौड यशस्वी चालूच आहे. बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्ग चक्र विस्कळीत होत असून झाडे तोडणे काही मिनिटात शक्य आहे पण तीच सावली आणि पक्ष्यांचे निवास स्थान असलेली विशाल झाडे वाढायला कित्येक वर्षे लागतात हे लहान पानापासूनच मुलांच्या मनावर बिंबवले पाहिजे. यासाठी वेळीच पावले उचलली गेली पाहिजेत. केवळ याच सद्भावनेतून आम्ही आमचा खारीचा वाट उचलत आहोत. प्राण वायूचा पुरवठा करणारी झाडे मानवी आरोग्यासाठी पण उपयुक्त आहेतच. वृक्षवल्ली आम्हा सोयरे या वाक्यानुसार निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी प्रदूषण विरहित जीवन जगण्यासाठी वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. दुधभाते यांनी यावेळी केले.



## पं. सतीश तारे यांना पं. भीमसेन जोशी पुरस्कार प्रदान

- शर्वरी जमेनीस यांच्या कथक नृत्याने पं. भीमसेन जोशी संगीत महोत्सवाची सांगता

**पुणे (आरंभ पर्व) :** कलाश्री संगीत मंडळ व द औंध सोशल फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात येणारा 'भारतरत्न पं. भीमसेन जोशी पुरस्कार' यंदा पं. सतीश तारे यांना आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. पं. भीमसेन जोशी संगीत महोत्सवाच्या सांगता समारंभात पं. सतीश तारे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पंकज महाराज गावडे, माजी महापौर दत्तात्रय गायकवाड, अजित गायकवाड, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाचे परीक्षक पं. रामराव नायक, कुलसचिव विश्वासराव जाधव, सामाजिक कार्यकर्ते सुभाष गायकवाड, कलाश्री संगीत मंडळाचे संस्थापक अध्यक्ष पं. सुधाकर चव्हाण, द औंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत गायकवाड, राधिका गायकवाड आदी उपस्थित होते. पंकज महाराज गावडे म्हणाले, की भारतीय परंपरा महान आहे. आज जगातील 35 टक्के लोक तणावात जीवन जगत आहेत. त्यांना संगीतातील राग बाहेर काढण्याचे काम करतात. आमदार सिद्धार्थ शिरोळे म्हणाले, की छंद जोपासल्याने मन मोकळे होते. त्यामुळे छंद जोपासले पाहिजेत. कलेची साधना केली पाहिजे. सतीश तारे म्हणाले, की काम करतानाची तळमळ, जिद्द आहे, याची दखल घेतल्याचे समाधान आहे. तत्पूर्वी, उस्ताद अर्शद अली खान यांनी राग मेघ बडाख्यालमध्ये गायनाला सुरुवात केली. रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या गायनाचे स्वागत केले. बाहेर पाऊस सुरू असतानाच त्यांनी ताल त्रितालमध्ये 'बादल वा बरसन लागे' सादर केलेली बंदिश टाळ्या मिळवून गेली.

## 'व्हिक्स की गोली अब हो गयी है बडी'




- रणवीर सिंग ने दिली व्हिक्सची सबसे बडी खबर

**पुणे (दै. आरंभ पर्व)** सुपरस्टार पावरहाऊस असलेल्या रणवीर सिंग ने आज व्हिक्सची 'सबसे बड़ी खबर'- 'व्हिक्स की गोली अब हो गयी है बड़ी' जाहीर केली असून प्रथमच भारतातील आयकॉनिक त्रिकोणी असा व्हिक्स कफ ड्रॉप्स मध्ये प्रथमच डबल पावर्ड ट्रान्सफॉर्मेशन केले आहे. हा बदल जवळजवळ दोन दशकांनंतर पुन्हा करण्यात आला आहे. पीॲन्डजी इंडिया च्या कन्झ्युमर हेल्थकेअर चे कॅटेगरी लीडर साहिल सेठी यांनी सांगितले " अनेक भारतीय पिढ्यांना खिच खिच मुक्त आवाज देणाऱ्या लोकांना "व्हिक्स की गोली लो, खिचखिच दूर करो" हे जिंगल लगेच भूतकाळात घेऊन जाते. ग्राहकांना काय हवे हे जाणून घेण्याची आणि त्याच बरोबर उत्पादनाच्या फॉर्म्युलेशनसह पॅकेजिंग मध्ये बदल करण्याची आमची परंपरा सुरु ठेवत आम्ही दशकातील सबसे बडी खबर देतांना खूपच उत्साही आहोत. भारताच्या आयकॉनिक त्रिकोणी व्हिक्स कफ ड्रॉप्स ची पहिली अशी डबल पावर्ड ट्रान्सफॉर्मेशन ने युक्त व्हिक्स डबल पावर कफ ड्रॉप्सची सुरुवात आम्ही करत आहोत. घशाची जळजळ आणि खोकल्याच्या लक्षणांपासून मुक्त होण्यास मदत करू शकणाऱ्या त्यांच्या पसंतीच्या कफ ड्रॉपच्या मोठ्या आकारात ग्राहकांच्या अभिप्रायाच्या आधारे तयार केलेले अशी आमची नवीन 'विक्स डबल पॉवर कफ ड्रॉप्स' ही बड़ी गोली बडी राहत देते. आता विक्स की गोली खाओ, बडी राहत पाओ." ब्रॅन्डच्या बडी राहत वचना विषयी बोलतांना व्हिक्स रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट चे संचालक डॉ. जसप्रित कोचर यांनी सांगितले " नवीन व्हिक्स डबल पावर कफ ड्रॉप हे एक उत्कृष्ट उत्पादन असून यामुळे खोकला आणि घशाच्या जळजळीपासून मुक्ती मिळते, यामध्ये प्रतिथयश आणि चांगल्या आयुर्वेदिक घटकांचा जसे मेंथॉल, निलगिरीचे तेल आणि कापूर इत्यादींचा समावेश आहे.



### नवले ब्रिजवरील वाहतूक कोंडीमुळे

## पुण्यातील चाकरमान्यांना मोठा फटका

> सध्या महाराष्ट्राभरात मान्सूनचे आगमन झाले आहे. यात सर्वाधिक अपघाताचे प्रमाण देखील वाढताना दिसून येतील. अश्या परिस्थितीत प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालावे अशा सूचना स्थानिक नागरिकांनी केले आहे.

**पुणे - विश्वजित भालेराव (दै. आरंभ पर्व)** नवले ब्रीज हा जितका अपघातासाठी बदनाम झाला आहे, तितकाच तो आत्ता वाहतूक कोंडीचा मुख्य प्रश्न बनला आहे. वाहतूक कोंडीचा प्रश्न पुणेकरांना सातत्याने भेडसावतो. तरीही यावर मार्ग काही निघत नाही. पुण्यातील पुणे-बेंगलोर महामार्गावर (नवले ब्रीज) येथे देखील आत्ता हीच परिस्थिती ओढवली आहे. वारंवार होणारे अपघात आणि रोज पाहायला मिळणारी वाहतूक कोंडी यामुळे पुण्यातील आयटी इंजिनियर्सची चांगलीच कोंडी झाली आहे. आणि म्हणूनच की काय आता पुण्यातील हिंजवडी भागातील 37 आयटी कंपन्या या स्थलांतरित होत आहे. वाहतूक प्रशासनाचा ढिसाळ कारभार आणि दुर्लक्षतेमुळे पुण्यातील चाकरमान्यांना चांगलाच फटका बसतोय. यावर प्रशासन केव्हा गांभीर्याने विचार करणार आहे व याबाबत कोणते ठोस पाउल उचलणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेलं आहे.

## इंडीयन ऑईल पुरस्कृत व फिडे आयोजित चेस फॉर फ्रीडम परिषदेचे पुण्यात आयोजन



**पुणे (दै. आरंभ पर्व)** भारतातील अग्रगण्य ऊर्जा उत्पादक कंपनी इंडीयन ऑईल यांनी प्रायोजित केलेल्या व आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ संघटना(फिडे)यांनी आयोजित केलेल्या दुसऱ्या चेस फॉर फ्रीडम परिषदेचे आयोजन येत्या 19 ते 21 जुन दरम्यान पुणे येथे करण्यात आले आहे.

फिडेच्या वतीने अखिल भारतीय बुद्धिबळ संघटना आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना यांनी या परिषदेचे आयोजन केले असून विविध ठिकाणी तुरुंगात असलेल्या जगभरातील बंदीवानांच्या पुनर्वसनासाठी बुद्धिबळ या खेळाचा कशा प्रकारे उपयोग करता येईल, यासंबंधी जगातील विविध देशांमधून आलेले तज्ज्ञ चर्चा करणार आहेत. यावेळी उपस्थित येरवडा कारागृहाच्या उपमहानिरीक्षक स्वाती साठे यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

"आम्हाला कैद्यांना बाहेर पडल्यावर पुन्हा समाजात चांगल्या पद्धतीने समोर आणायचे आहे. यासाठी माणसाची मानसिकता बदलण्यासाठी खेळ हे एक उत्तम माध्यम आहे. इंडियनऑइल चे कौशल्य आणि कल्पना आणि आमच्या कैद्यांनी एकत्र येऊन इतिहास घडवला. बाहेर राहणाऱ्या खेळाडूला जमणार नाही, ते आमच्या खेळाडूंनी करून दाखवले आहे. सुधारणा आणि पुनर्वसन हे जेल प्रशासनाचे ब्रीदवाक्य या कैद्यांनी खरे करून दाखवले. त्याचा हा एक महत्वाचा टप्पा आहे.

सध्या येरवडा कारागृहआत पुरूष आणि महिला असे एकूण 200 कैदी बुद्धिबळ शिकत आहेत. असे कारागृहाच्या उपमहानिरीक्षक स्वाती साठे यांनी सांगितले. या परिषदेबद्दल माहिती देताना ग्रँडमास्टर आणि इंडियन ऑइल मुख्य व्यवस्थापक (कर्मचारी सेवा आणि क्रीडा) अभिजीत कुंटे म्हणाले की, 'दुसरा चेस फॉर फ्रीडम 19 जूनपासून या परिषद सुरुवात होणार आहे. यामध्ये चर्चासित्रे, परिसंवाद आणि मुलाखती याचा समावेश आहे. आभासी (ऑनलाईन) पद्धतीने होणाऱ्या या चर्चासित्रात जगभरातील तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत.' हा उपक्रम आणि बुद्धिबळ स्पर्धांचा कार्यक्रम इंडियन ऑईलच्या वतीने पुरस्तृत करण्यात येणार आहेत.


## 'प्रॉब्लेम ऑफ रुपी'वर शतकोत्तर जागतिक परिषद, लंडन येथे संपन्न




**पुणे (दै. आरंभ पर्व)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 1923 मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये ' दि प्रॉब्लेम ऑफ रुपी : इट्स ओरिजिन अंड इटस सोल्युशन' या विषयावरील प्रबंध डी.एस्सी पदवीसाठी सादर केला होता. याच्या शतकपूर्ती निमित्त सायास सहकारी संस्था, पुणे आणि मराठी अर्थशास्त्र परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने लंडन येथे जागतिक परिषदेचे आयोजन केले होते. दि 11 जुन 2024 रोजी भरवण्यात आलेल्या या जागतिक परिषदेत भारताच्या आर्थिक स्थितीवर भाष्य करणारा लेखाजोखा मांडण्यात आला. या परिषदेसाठी ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्रा. डॉ.जरेमी ड्विगेलर ,लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स चे डॉ.फ्रान्सिस्को ट्रिकांडो मुनोरा, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश पृथ्वीराज चव्हाण व संजय देशमुख, आय.डी.बी.आय बँकेचे माजी चेअरमन किशोर खरात , दिल्ली विद्यापीठाचे प्रा.डॉ.संजोय रॉय, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे माजी जनरल मॅनेजर दीपक कांबळे, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्न वराळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या परिषदेसाठी 6 ते 12 जून 2024 या कालावधित भारतातून 31 प्रतिनिधी आणि इतर ठिकाणावरून 14 प्रतिनीधी लंडनमध्ये दाखल झाले होते.

## ओप्पो तर्फे एफ27 प्रो+5जी ची सुरुवात

- भारतातील पहिला आयपी६९ रेटेड सुपर रग्गड मान्सून रेडी फोन




**पुणे (दै. आरंभ पर्व)** ओप्पो इंडिया ने प्रथमच F27 pro+5G या भारतातील पहिल्या आयपी66, आयपी 68 आणि आयपी 69 रेटेड सुपर रग्गड , मान्सून रेडी स्मार्टफोनची सुरुवात केल्याची घोषणा केली. एफ 27 प्रो+ आता डस्क पिंक आणि मिडनाईट नेव्ही या दोन रंगात 128 जीबी स्टोअरेज सह रु. 27,999 मध्ये तर 256 जीबी स्टोअरेज सह रु. 29,999 या किंमतीत उपलब्ध असेल. या स्मार्टफोन मुळे ओप्पो च्या फूल डिव्हाईस प्रोटेक्शन उपायांना चालना मिळणार असून यामध्ये 360 अंशातील आर्मर बॉडी आहे, ज्यामुळे या उपकरणाचे थेंबांसह ओरखड्यांपासून संरक्षण होते. या सर्वांसह यामध्ये 5000 एमएएच ची टिकाऊ बॅटरीही आहेच.

या सुरुवाती विषयी बोलतांना ओप्पो इंडियाच्या प्रॉडक्ट कम्युनिकेशन्स चे संचालक सॅव्हिओ डिसुझा यांनी सांगितले " सातत्याने उन्हात आणि पावसात फिरतीवर असणाऱ्या आणि टिकाऊ स्मार्टफोनची मागणी असणाऱ्या ग्राहकांची गरज ओप्पो एफ27 प्रो+5जी पूर्ण करत आहे. हा एकमेव असा स्मार्टफोन आहे जो सर्व तीनही आयपी 66, आयपी 68 आणि आयपी 69 रेटिंग्ज पूर्ण करतो आणि धूळ तसेच पाण्यापासून होणाऱ्या धोक्यापासून सुरक्षित आहे. त्याच बरोबर यातील 360 अंशातील आर्मर बॉडी मुळे संपूर्ण सुरक्षेसह प्रमाणित स्विस एसजीएस प्रिमियम परफॉर्मन्स स्टॅन्डर्ड आणि एमआयएल-एसटीडी-810एच मेथड 516.8 सर्टिफाईड फोन आहे. इतक्या सगळ्यांबरोबरच आकर्षक, बॉर्डरलेस डिस्प्ले, सुंदर कॅमेराज आणि सर्वोत्कृष्ट क्षमतेचा प्रोसेसर हा सडपातळ, हलक्या आणि स्टायलिश अशा मजबूत आणि दाखवण्यास योग्य उपायांसह उपलब्ध आहे."

ओप्पो एफ27 प्रो+5जी हा पहिला असा फोन आहे ज्यामध्ये धूळीपासून आणि पाण्यापासून बचाव करणारी तीन रेटिंग्ज म्हणजेच आयपी 66, आयपी 68 आणि आयपी 69 उपलब्ध आहेत. या स्टॅन्डर्ड्स नुसार विशेष पध्दतीने हा फोन प्रमाणित होतो की जो उच्च दबाव, उच्च तापमानाने युक्त वॉटर जेट्स सह 30 मिनीटांपर्यंत पाण्याखाली राहू शकतो.

या फोनचा टिकाऊपणा हा धूळ आणि पाण्याच्या सुरक्षेपेक्षा अधिक देऊ करतो कारण यामध्ये डॅमेज प्रुफ 360 अंशातील आर्मर बॉडी प्रोटेक्शन देण्यात आले असून यासाठी यामध्ये स्पंज सारखे इंटर्नल डॅंपनिंग मटेरिअल वापरण्यात आल्याने पडण्यापासून सुरक्षेसह मजबूती, उच्च तापमानात काम करणारे ॲल्युमिनियम ॲलॉय वापरल्याने मदरबोर्ड सुरक्षित राहतो आणि कॉर्निंग गोरिला ग्लास व्हिक्टस 2 चा वापर स्क्रीनवर करण्यात आला आहे.

### किंमत, उपलब्धता आणि ऑफर्स

ओप्पो एफ27 प्रो+5जी आता भारतात २० जून २०२४ सून उपलब्ध असणार आहे. १२८ जीबीच्या मॉडेलची किंमत ही रु २७९९९ तर २५६ जीबी च्या मॉडेलची किंमत ही रु २९,९९९ इतकी असेल.

## कोरोना रेमेडीजने पेरिफेरल न्यूरोपॅथी स्क्रीनिंगचा रेकॉर्ड मोडला




**अहमदाबाद (दै. आरंभ पर्व)** सर्वांसाठी चांगले आरोग्य राखण्यासाठी समर्पित असलेल्या अहमदाबाद स्थित कोरोना रेमेडीज या फार्मास्युटिकल कंपनीने, एकाच आठवड्यात बायोथेसिओमीटर वापरून पेरिफेरल न्यूरोपॅथीसाठी सर्वाधिक रुग्णांची तपासणी करण्याचा एशियातील रेकॉर्ड स्थापित केला आहे.

एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्सद्वारे मान्यताप्राप्त, ही उल्लेखनीय कामगिरी 5 ते 11 मे 2024 या कालावधीत पार पडली, जी जागतिक स्तरावर न्यूरोपॅथी अवेअरनेस वीक म्हणून साजरी केली जाते. ही उपलब्धी आरोग्य जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित करते आणि समन्वित आरोग्य प्रयत्नांच्या परिणामावर प्रकाश टाकते.

कोरोना रेमेडीजच्या टीमने न्यूरोपॅथी अवेअरनेस वीक दरम्यान न्यूरोपॅथी तपासणी शिबिरांमध्ये 1,231 डॉक्टरांच्या मदतीने संपूर्ण भारतभरातील 21,012 रुग्णांची तपासणी केली. हा उपक्रम कंपनीच्या "मिशन हील इंडिया" उपक्रमाचा एक भाग होता. यामध्ये स्थानिक आरोग्य सेवा प्रदाते, दवाखाने आणि हॉस्पिटल्स आणि शहरी केंद्रांमधील समुदाय नेते, ग्रामीण गावे आणि दुर्गम भाग यांच्या सहकार्याचा समावेश होता.

श्री नीरव के. मेहता, प्रमोटर आणि एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, कोरोना रेमेडीज म्हणाले, "हा उपक्रम जागरूकता वाढवण्याबद्दल आणि जे शांतपणे चुपचाप त्रास सहन करतात अश्या हजारो लोकांना लवकर उपचार देण्याबद्दल आहे. पेरिफेरल न्यूरोपॅथी जीवनाच्या गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम करू शकते. अधिकाधिक रुग्णांना या स्थितीची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने आम्ही वर्षभर नियमितपणे पेरिफेरल न्यूरोपॅथीची तपासणी करण्यासाठी समर्पित आहोत. व्यापक वैद्यकीय समुदायाच्या सहकार्याने 'मिशन हील इंडिया'च्या माध्यमातून रुग्णांच्या जीवनात कायमस्वरूपी बदल घडवून आणण्याचे आमचे ध्येय आहे."

पेरिफेरल न्यूरोपॅथी जागतिक स्तरावर लाखो लोकांना प्रभावित करते, विशेषत: ज्यांना मधुमेह, एंडोक्राइन डिसऑर्डर किंवा व्हिटॅमिन बी 12 ची कमतरता आहे. न्यूरोपॅथीला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांमध्ये शाकाहारी आहार, व्हिटॅमिन बी 12 आणि व्हिटॅमिन डीची कमतरता, जास्त अल्कोहोल सेवन, विषारी पदार्थांचा संपर्क, काही औषधांचे दुष्परिणाम आणि अनुवांशिक विकार यांचा समावेश होतो.

प्रभावी व्यवस्थापनासाठी लवकर तपासणी करणे अत्यंत महत्वाचे आहे, विशेषत: मधुमेही रुग्णांमध्ये, कारण अशा रुग्णांपैकी 50% रुग्णांमध्ये न्यूरोपॅथीची लक्षणे नसतात. वेळेवर उपचार न केल्यास, या स्थितीमुळे पायाच्या अल्सरसारख्या गंभीर समस्या होऊ शकतात, ज्यामुळे अंगविच्छेदनाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. जागरुकता वाढवण्याबरोबरच, या अनोख्या उपक्रमाने आजाराबाबत मौल्यवान माहितीही दिली आहे. एक उल्लेखनीय निष्कर्ष असा आहे की इतरांच्या तुलनेत मधुमेहाच्या रुग्णांमध्ये गंभीर न्यूरोपॅथीचे प्रमाण 2.67 पट आणि मध्यम न्यूरोपॅथीचे प्रमाण 2.56 पट जास्त आहे.

एशियाई देशांसाठी एक प्रमुख रेकॉर्ड ठेवणारा, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड,वर्ल्ड रेकॉर्ड युनियन अंतर्गत कार्य करते. हे व्हिएतनाम, नेपाळ, कंबोडिया, भारत, इंडो-चीन, बांग्लादेश, यूएस, युक्रेन बुक आणि इंडोनेशियामधील विविध राष्ट्रीय रेकॉर्ड बुकच्या संयोगाने काम करते. त्याचे मुख्यालय भारत आणि व्हिएतनाममध्ये आहे.

## थोडक्यात



### विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक वारसा जपावा : डॉ. रवींद्र भोळे

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** शासन विविध शैक्षणिक योजना राबवून शेवटच्या माणसाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करीत आहे. शासनाचा ह्या शैक्षणीक विविध योजनेचा लाभ घ्यावा. तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच आपल्या संस्कृतीचे भान ठेवावे, विविध शास्त्राचे पठण करून बुद्धिवान व्हावे. ज्याप्रमाणे योद्धा रणांगणावर फक्त युद्ध करण्यासाठी सज्ज होतो ,त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी संस्कारक्षम होऊनशिक्षण घ्यावे, विद्या ग्रहन करून नावलौकिक वाढवावा. आपले विविध छंद जोपासावेत. अन्न ,अक्षर याशिवाय आरोग्य सांभाळावे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर राष्ट्राचा सुसंस्कृत वारसा जपावा, असे मत जेष्ठ समाजसेवक डॉ.रवींद्र भोळे यांनी येथे व्यक्त केले. येथे सरस्वती विद्यामंदिर शाळेत शासनाच्या वतीने देण्यात येणारे शालेय पुस्तक वाटप कार्यक्रम व शाळेच्या पहिल्या दिवसानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापक दत्तात्रय कुंजीर यांनी ई लर्निंग प्रोजेक्ट आपल्या स्वर्गीय मातोश्री सुभद्राबाई गुलाब कुंजीर यांच्या स्मरणार्थ भेट दिला हे कार्य कौतुकास्पद आहे. याप्रसंगी मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते मुलांना शाळेतील प्रथम दिनानिमित्ताने पुष्पगुच्छ देण्यात आले. त्याचप्रमाणे शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या शालेय पुस्तक संचाचे वाटप करण्यात आले. तसेच विध्यार्ध्यांना खाऊ व फळे वाटप करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर उरुळी कांचन चे नवनिर्वाचित सरपंच अमित बाबा कांचन, रुकसाना अत्तार मॅडम बँक अधिकारी बँक ऑफ इंडिया, रोहिदास मुरकुटे, शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कुंजीर सर ,हेमलता काळे, भारती गोते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे प्रमुख मान्यवरांमध्ये मनीषा मेमाणेमॅडम, संजय कुंजीर सर, अमोल कुंजीर सर ,लीना धीवार मॅडम, किरण तळेले सर, स्मिता तोडकरी मॅडम, लता चव्हाण मॅडम,इत्यादी शिक्षक वृंद उपस्थित होते. या कार्यक्रमाला पालक वर्ग खंडागळे, पाटोळे, ननावरे, डोलारी इत्यादी पालक वर्ग उपस्थित होते. ह्या प्रसंगी शाळेमध्ये रांगोळी काढून पुष्प सजावट, करण्यात आली होती. अत्यंत प्रसन्न वातावरणामध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.

### कोटक जेन 2 जेन प्रोटेक्ट योजनेचा शुभारंभ

**पुणे (आरंभ पर्व) :** कोटक महिंद्रा लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ("कोटक लाइफ") ने आज त्यांची कोटक जेन 2 जेन प्रोटेक्ट ही नवीन संरक्षण योजना सुरू करत असल्याची घोषणा केली आहे. ही योजना दोन पिढ्यांना एकाच योजनेत संरक्षणरूपी विमाकवच देण्याचा पर्याय देत आहे. विमा उद्योगात प्रथमच असा पर्याय सादर केला जात आहे. अशा प्रकारे कोटकची ही योजना विमारूपी संरक्षण कवचाचा वारसा पुढच्या पिढीला हस्तांतरीत करत आहे. विमाधारकाच्या हयातीनंतर प्रीमियम लाभाचा 100 टक्के खात्रीशीर परतावा देणाऱ्या कोटक जेन 2 जेन प्रोटेक्ट योजनेत जेव्हा पालक (प्राथमिक जीवन विमाधारक) वयाची साठ किंवा पासष्ट वर्षे पूर्ण करतात तेव्हा संपूर्ण जोखीम संरक्षण मुलाला हस्तांतरित करण्याची लवचिकता ही योजना पालकांना देते. याव्यतिरिक्त, हे जोखीम कवच मुलाच्या वयाच्या साठव्या वर्षापर्यंत टिकते.

# वारजे ते कोंढवे-कोपरे रस्त्यावर ठिकठिकाणी साचते पाणी

## वाहतूक ठप्प, उपाययोजनेची मागणी



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)** पावसाळा सुरू झाल्यानंतर नेहमीप्रमाणे वारजे ते कोंढवे-कोपरे या सुमारे आठ किलोमीटरपर्यंतच्या रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी साचण्यास सुरूवात झाली आहे. यामुळे रस्त्यावरील वाहतूक संथ होऊन वारंवार कोंडी होण्याचे प्रकार घडत आहेत. या ठिकाणी महापालिकेने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी वाहनचालक करीत आहेत.

वारजे, शिवणे, उत्तमनगर, कोंढवे-कोपरेपर्यंतच्या रस्त्यावर 10 ते 12 ठिकाणी पावसाचे पाणी साचत आहे. या रस्त्याचे रुंदीकरण करताना छोटे पूल गायब झाल्याने येथे पाणी निचरा होण्यासाठी पर्याय उरला नाही. त्यानंतर हा भाग महापालिकेत समावेश झाला आहे. पावसाचे पाणी रस्त्यावर साचल्यावर येथे वाहतूक यंत्रणा पोहचण्यासही वेळ लागतो. परिणामी वाहतूक कोंडी होते. त्यामुळे वारजे ते कोपरेपर्यंतच्या रस्त्यावर साचणाऱ्या पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे झाले आहे.

### पाणी साचण्याची ठिकाणे, कारणे व परिणाम

१. वारजे गणपती माथा ते शिवणे शिंदे पूल - महापालिकेने पावसाळी वाहिनी टाकली असूनही ठिकाणांवर परिसरातून वाहून आलेले पाणी येथे जमा होत आहे. असून पाण्याचा निचरा होण्यासाठीचा पूलही आता येथे नाही.
२. शिवणे-दुधाणे पेट्रोल पंप - कॉँक्रिटच्या रस्त्यावर खड्डा पडला आहे. त्यामुळे येथे साचणारे पाणी नागरिकांच्या अंगावर उडत आहे.
३. सारस्वत बँक आणि बँक ऑफ इंडिया - मुख्य रस्ता व पादचारी मार्ग समपातळीत नसल्याने येथे खड्डा तयार झाला आहे. तसेच येथे साचणाऱ्या पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था नाही. परिणामी दोन ते चार दिवस येथे पाणी तसेच राहत आहे. याचा त्रास पादचारी व वाहनचालकांना होत आहे.
४. इंगळे कॉलनी, शाहू बँक - यापूर्वी अरुंद रस्ता असताना येथे पूल होता. रस्त्याच्या रुंदीकरणानंतर पूल काढण्यात आला. या ठिकाणी रस्त्याला वळण आहे. त्यामुळे पावसाचे पाणी अर्ध्या रस्त्यावर साचल्याने वारजेकडे जाणारी वाहतूक विरुद्ध बाजूने जाते. परिणामी कोंडी होते.
५. उत्तमनगर, बाजार समिती - समितीच्या भिंतीमुळे एनडीएतून बाहेर आलेले पावसाचे पाणी रस्त्यावर साचते. परिसरातील घरांमध्येही हे पाणी शिरते. रस्त्याजवळील पुलाची एक बाजू बंद असल्याने पाण्याचा निचरा नाही. त्यामुळे हे पाणी मुख्य रस्त्यावरून वाहते.
६. जलशुद्धीकरण केंद्र - येथील रस्त्यावर दीड फुटापर्यंत पाणी साचते. रस्त्यावर मोठा खड्डा पडला आहे. पाणी निचरा होण्याची व्यवस्था पुरेशी नाही. पूर्वी रस्ता अरुंद असताना येथे पूल होता. रस्ता रुंदीकरणनंतर पूल गायब झाल्याने ही समस्या उद्भवली आहे.
७. कोंढवे धावडे पूल - जुन्या पुलाप्रमाणेच नवीन पूलही बांधण्यात आला. रस्त्यावरून दोन्ही बाजूने सुमारे अर्धा किलोमीटरवरून पावसाची पाणी वाहत येते. ते वाहून जाण्याची पुलावर व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे येथे दोन फुटांपेक्षा जास्त पाणी साचून दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प होते.

रस्त्याचे रुंदीकरण करताना पाणी जाण्यासाठीची व्यवस्था पुढे कायम केलेली नाही. परिणामी पाणी साचते आणि त्यानंतर वाहतूक कोंडी होते. पाणी साचल्याची माहिती मिळताच आमच्या पातळीवर कार्यवाही केली जाते. जास्तीत जास्त ठिकाणी पावसाळी वाहिनी बसवण्यासाठी निधी अंदाजपत्रक केले आहे. तसेच काही ठिकाणी कामही सुरू केले आहे.

**- विजय नायकल, सहाय्यक आयुक्त, वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय**

जलशुद्धीकरण केंद्रासमोर सेवालालनगर आणि गणपती मंदिरापासून पाणी वाहत येते. रस्त्यावर खड्डे झाल्याने गुडघ्यापर्यंत पाणी साठते. त्या पाण्यात मोठे वाहन गेले की लाट तयार होऊन ते पाणी या परिसरातील दुकानांत व घरांमध्ये शिरते. हे पाणी जाण्यासाठी ग्रामपंचायतीने वाहिनी केलेली नाही. त्यामुळे या परिसरापासून ते भीमनगरच्या ओढ्यापर्यंत पावसाळी वाहिनी टाकावी.

**- सागर बारटक्के, ग्रामस्थ**

## उपसरपंच मुलांसाठी ठरले देवदूत

**पुणे (दै. आरंभ पर्व)** आंधळगाव, इनामगाव (ता. शिरुर) : येथील शेततळ्यात बुडणाऱ्या पाच अल्पवयीन मुलांचे प्राण उपसरपंच सूरज मचाले यांनी दाखवलेल्या धाडस व तत्परतेने वाचले. त्यांच्या या धाडसाचे कौतुक होत आहे. इनामगाव येथील खरात व कांगुणे कुटुंबातील शिवराज मनोहर कांगुने, सक्षम नवनाथ खरात, ओंकार किरण खरात, गौरव किरण खरात, पृथ्वीराज रवींद्र खरात ही मुले शनिवारी (ता. 15) दुपारी चार वाजता गावातील एका शेतकऱ्याच्या शेततळ्यात पोहण्यासाठी गेली होती. परंतु, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने व काही मुलांना पोहता येत नसल्याने मुले पाण्यात बुडू लागली. यावेळी इनामगावचे उपसरपंच सूरज मचाले हे शेततळ्याशेजारीच असलेल्या आपल्या बोअरवेलची मोटर बंद करण्यासाठी आले होते. परिसरात मुलांचा आवाज येत असल्याचे लक्षात आल्याने त्यांनी शेततळ्याकडे धाव घेतली. शेततळ्यात सर्व मुले बुडत असल्याचे पाहून त्यांनी क्षणाचाही विलंब न करता शेततळ्यात उडी मारून सर्व मुलांना बाहेर काढले. दैवबलवत्तर म्हणून सूरज मचाले यांच्या धाडसामुळे पाचही मुलांचे प्राण वाचले आहेत.

## लोकमंगल ना.स.पतसंस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना सन्मान



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)** लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,सोलापूर शाखा - लोणी काळभोर येथे इयत्ता 10 वी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास लोकमंगल पतसंस्थेचे संचालक शिवाजी माळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी डिवायएसपी आनिल कांबळे यांच्या हस्ते कु.आर्या होनराव 94.40 टक्के, कु.वैष्णवी गुप्ता 92.00 टक्के, कु. अनुष्का खानपाटे 88.00 टक्के, कु.आर्या काळे 87.60, कु. सिध्दी शिंदे 87 टक्के. या विद्यार्थ्यांना अहवाल, भेटवस्तू व गुलाबाचे फुल देऊन सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास लोणी काळभोर शाखेचे सर्व सल्लागार, पुणे विभागाचे विभागीय अधिकारी कमलाकर पाटील, शाखाधिकारी मारुती चौगुले तसेच सर्व कर्मचारी, खातेदार, ठेवीदार उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना मारुती चौगुले यांनी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्ये लोकमंगल उद्योग समूहाची माहिती लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर संचालक शिवाजी माळी यांनी दिली. कार्यक्रमाचे आभार पुणे विभागीय आधिकारी कमलाकर पाटील यांनी मानले व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनल कुंभार, मोहिनी जगताप, अक्षय थोरात, आशिष माने या कर्मचाऱ्यांनी कष्ट घेतले व कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात सम्पन्न झाले.

# भारतीय महिलांचे सक्षमीकरण : 'द शॅटर्ड सीलिंग' हे पुस्तक प्रकाशित



**मुंबई (दै. आरंभ पर्व)** प्रेस क्लब ऑफ मुंबईमध्ये एका प्रेरणादायी कार्यक्रमात गीत जलोटा यांनी 'द शॅटर्ड सीलिंग: नॅरेटिव्हज ऑफ पायनियरिंग वुमन' या त्यांच्या दुसऱ्या पुस्तकाचे अनावरण केले. मुलाखतींच्या या आकर्षक संग्रहात दहा नामवंत महिला आहेत ज्या भारतीय उद्योगात अग्रणी आहेत. या महिलांनी पहिल्यांदाच उत्तुंग यश मिळवण्याबाबतचे त्यांचे मत आणि महिलांनी त्यांच्या कामाच्या ठिकाणी काय लक्षात ठेवले पाहिजे याबद्दल सांगितले आहे.

'द शॅटर्ड सीलिंग' वाचकांना या यशस्वी महिलांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनाचा सखोल आढावा पुरवते. प्रत्येक मुलाखतीसोबत त्या महिलेची माहिती आणि "माय टेक" शीर्षकाद्वारे त्यातल्या मुख्य उपयुक्त माहितीचा सारांश दिला आहे. जलोटा यांनी या प्रभावशाली महिलांप्रती त्यांच्या स्पष्ट आणि अनारक्षित प्रतिसादांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, करिअरमध्ये प्रगती करणाऱ्या महिलांसाठी मौल्यवान धडे यात आहेत असा त्यांचा विश्वास आहे. महिलांसाठी आर्थिक स्वातंत्र्याचे महत्त्व, नेटवर्किंग कशी मदत करते, काही करिअरमध्ये महिला इतरांपेक्षा अधिक चांगल्या का आहेत आणि संस्थांमध्ये सर्वसमावेशक संस्कृती कशी सुनिश्चित करावी, हे सर्व या पुस्तकातून मिळते.

पुस्तकात असलेल्या मुलाखती:दीना मेहता - पहिल्या महिला व्यापारी आणि बीएसई एक्सचेंजच्या माजी अध्यक्षा.

सुचेता शाह - कार्यकारी संचालक - ॲटलस इंटिग्रेटेड फायनान्स.

विजयालक्ष्मी छाबरा - दूरदर्शनच्या पहिल्या महिला महासंचालक.

अनिता खुराना - विलीनीकरणानंतर इंडियन एअरलाइन्स/एअर इंडियामध्ये कमर्शियल डायरेक्टर म्हणून नियुक्त झालेली पहिली महिला.

पांचाली मुखोपाध्याय - हर्बालाइफ येथील विक्री आणि विपणन व्हीपी.

क्रेशा बजाज - क्रिशा बजाज या लेबलची संस्थापक.

संजू यादव - फार्मा बिझनेस हेड, प्रतिबंधात्मक आरोग्य आणि तंदुरुस्तीवर तिच्या नाविन्यपूर्ण कल्पनांसाठी ओळखल्या जातात.

सुष्मिता चक्रवर्ती - सीएससी इंडिया येथे आयटी उद्योगातील असोसिएट डायरेक्टर-स्तरीय पदावर पोहोचणाऱ्या पहिल्या महिलांपैकी एक. कनिका मोहन सक्सेना - द्वितीय महिला मास्टर स्कूबा डायव्हिंग ट्रेनर आणि व्होडाफोन आयडीया लि (vi) मधील डिजिटल सामग्री सेवांच्या उपाध्यक्षा.

अनुराधा देब - प्रोसेस वर्क इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया आणि ड्रीम क्लिनिकच्या संस्थापक.

'द शॅटर्ड सीलिंग' लिहिण्यामागचा गीत जलोटा यांचा उद्देश, हे रोल मॉडेल्स दाखवणे आणि नोकरी करणाऱ्या महिलांच्या पुढच्या पिढीला त्यांच्या करिअरमध्ये आत्मविश्वासाने प्रगती करण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि समर्थन प्रदान करणे, हा आहे. भारतीय कॉर्पोरेट क्षेत्राने या महिलांनी केलेल्या योगदानाची कबुली देणे आवश्यक आहे, महिलांच्या प्रवेशासाठी उद्योगाची विविध क्षेत्रे खुली करणे आणि उच्च उद्दिष्टासाठी एक कल सेट करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमादरम्यान जलोटा म्हणाले, "या पुस्तकात सहभागी झालेल्या सर्व प्रस्थापित महिलांची मी मनापासून आभारी आहे. त्यांचा प्रवास आणि अंतर्दृष्टी बद्दल सांगण्याच्या त्यांच्या इच्छेमुळे 'द शॅटर्ड सीलिंग' सर्व महिलांसाठी एक शक्तिशाली संसाधन बनले आहे. मला आशा आहे की हे पुस्तक उपयोगी पडेल. तसेच महिलांना त्यांच्या आर्थिक स्वाभिमानाची आठवण म्हणून आणि त्यांच्या व्यावसायिक आकांक्षांचा आत्मविश्वासाने पाठपुरावा करण्यास प्रोत्साहित करेल."

'शॅटर्ड सीलिंग' हे भारतातील लैंगिक विविधता आणि महिला सशक्तीकरण या विषयावरील प्रवचनासाठी महत्त्वपूर्ण योगदान ठरणार आहे, ज्यामुळे महिलांना त्यांच्या स्वतःच्या मर्यादा तोडण्यासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी आणि प्रेरणा मिळेल. गीतच्या "स्त्रियांनी शुक्र सोडला आहे का? कामाच्या ठिकाणी लिंगभेद मोडणे" या पहिल्या पुस्तकात, उंच झेप घेण्याची एक चौकट अतिशय चांगल्या प्रकारे स्पष्ट करण्यात आली आहे.

द शॅटर्ड सीलिंग, या 207 पानांच्या पुस्तकाची किंमत रु. 350 आहे आणि एनेकडोट पब्लिशिंग हाऊस द्वारे प्रकाशित, हे पुस्तक सध्या Amazon वर तसेच पुस्तकांच्या दुकानात उपलब्ध आहे.

लेखिकेबद्दल : गीत जलोटा या दिल्ली विद्यापीठातून TISS मधून कार्मिक व्यवस्थापनात पदविका असलेल्या पदव्युत्तर पदवीधर आहेत. भारतातील स्त्रिया उच्च शिक्षित असताना आणि उच्च-स्तरीय नोकऱ्यांमध्ये समान प्रवेश मिळवत असताना, सामाजिक परिस्थितीमुळे त्यांना अनेकदा त्यांचे करिअर सोडावे लागते, यावर त्या भर देतात. कॉर्पोरेट एचआर आणि ट्रेनिंगमधील त्यांच्या तीन दशकांच्या अनुभवावर आधारित, त्यांचा असा विश्वास आहे की विशेषत: भारतीय महिलांसमोरील अनोखी आव्हाने, इतरांची वाट पाहण्याऐवजी स्त्रियांनी स्वतः बोलून त्यांच्या समस्या सोडवल्या पाहिजेत. त्यांना आशा आहे की हे पुस्तक महिलांना त्यांच्या आर्थिक वास्तवाबद्दल आणि मूल्याबद्दल जागृत करेल.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.